राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
'सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ'

# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

गुरु नानक भवन, अंबाझरी वळणमार्ग, विद्यापीठ परिसर, नागपूर – ४४० ०३३ दूरध्वनी : २५३०८६०
ई–मेल : doll_rtmnu@gmail.com

क्र. आअविवि/६५/१७
दिनांक : २१/८/२०१७

प्रति,
विस्तार सेवा कार्यक्रमात सहभागी
महाविद्यालयांचे सन्माननीय प्राचार्य आणि
स्नातकोत्तर शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

विषय:– प्राचार्य/विभागप्रमुख आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांची विद्यापीठस्तरीय सभा.

महोदय/महोदया,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या विस्तार सेवा कार्यक्रमांत तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन शिक्षण अभियानात आपले महाविद्यालय/शैक्षणिक विभाग सहभागी झाले आहे. या दोनही उपक्रमांची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी म्हणून विभागाने सत्र २०१७–२०१८ मध्ये सदर उपक्रमांत सहभागी झालेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक विभागांचे प्रमुख आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांची एक विद्यापीठस्तरीय मार्गदर्शन सभा आयोजित केली आहे. या सभेला मा. कुलगुरु डॉ. सिध्दार्थविनायक काणे उपस्थित राहून उद्‌बोधित करणार आहेत. याप्रसंगी मा. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांची प्रमुख उपस्थिती राहील.

सभेची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| विषय | :– | विस्तार सेवा कार्यक्रमांतर्गत कार्यन्वित करावयाचे उपक्रम तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन शिक्षण अभियानांतर्गत अभ्यासक्रमांची अंमलबजावणी (प्रामुख्याने प्रोत्साहनपर गुणदायी माहिती संकलन प्रकल्प व राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प) |
| वार व दिनांक | :– | शुक्रवार दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ |
| वेळ | :– | दुपारी १२.३० वाजता |
| स्थळ | :– | गुरूनानक भवन, विद्यापीठ परिसर, अमरावती मार्ग, नागपूर. |

आपणांस विनंती आहे की, उपरोक्त सभेस कार्यक्रम अधिकाऱ्यांसह उपस्थित राहून विभागाला सहकार्य करावे . सभेसाठी जाण्यायेण्याचा खर्च महाविद्यालयाच्या वतीने करण्यात यावा.

सहकार्याच्या अपेक्षेसह.

आपला विनीत

(डॉ.मोहन काशीकर)
संचालक